किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‍बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● दर्शन

५ ● भारतीय बँकिंग उद्योग
वास्तव आणि आव्हाने

२१ ● प्रा. कुमुदिनी दांडेकर
एक प्रयोगशील संशोधिका



**खंड १५ : अंक ९** **डिसेंबर २०१६**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**



वार्षिक वर्गणी २००/- रुपये (**परदेशस्थ वाचकांसाठी $ २०**) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १५ (अंक ९) डिसेंबर २०१६**
**संपादक - अभय टिळक**
**सहसंपादक - मानसी सराफ जोशी**


### *'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‍बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

●या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

●अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# दर्शन

अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेले २०१७ हे नूतन वर्ष आपणा सगळ्यांनाच मोठे आनंदाचे, समाधानाचे, शांतीचे आणि निरामय आरोग्याचे ठरो, हीच शुभकामना.

चालू कॅलेंडर वर्षातील 'अर्थबोधपत्रिके'च्या या शेवटच्या अंकात एक प्रयोग केलेला आहे. खरे म्हणजे ते एक धाडसच म्हणावयास हवे. एवढे संपादकीय वगळता या अंकात अवघे दोनच काय ते लेख छापलेले आहेत. दोन्ही लेख चांगल्यापैकी प्रदीर्घ असे आहेत. या स्वरूपात आपल्यापुढे 'अर्थबोधपत्रिके'चा अंक याच्या पूर्वी कधी सादर केलेला नव्हता. उभय लेखांचे विषय मनोज्ञ आहेत. त्यांमुळे विस्तारभयाचे ओझे मनावर येऊन देता ते विस्तृत सादर केलेले आहेत. विशेष म्हणजे, या दोन्ही लेखांचे मान्यवर लेखक हे भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीशी संलग्न आहेत. अंकातील पहिल्या लेखात लेखाजोखा मांडलेला आहे तो आपल्या देशातील बँकिंग उद्योगाचा. त्यांत मुख्य भर दिलेला आहे तो सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना भेडसावणा-या थकित कर्जांच्या समस्येचा कार्यकारणभाव उलगडून मांडण्यावर. या समस्येवर तोडगा शोधण्यासाठी रिझर्व्ह बँक आणि केंद्र सरकार यांनी आजवर राबविलेल्या उपक्रमांचा तपशीलही त्यांतच मांडलेला आहे. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक मंडळाच्या सदस्य आणि 'एल् ॲन्ड टी फायनान्शिअल सर्व्हिसेस्'च्या समूह अर्थतज्ज्ञ म्हणून सध्या कार्यरत असणा-या डॉ. रूपा रेगे - नित्सुरे यांचे भारतीय बँकिंग उद्योगाचे वास्तव व त्याच्या पुढ्यातील आव्हाने यांचे विवरण करणारे सादरीकरण संस्थेच्या पुण्यातील वास्तूमध्ये १९ नोव्हेंबर २०१६ या दिवशी आयोजित करण्यात आलेले होते. त्या सादरीकरणादरम्यान डॉ. रेगे यांनी केलेल्या विवेचनाचा पहिला भाग या अंकातील पहिल्या लेखात सादर केलेला आहे. त्यांच्या विश्लेषणाचा उत्तरार्ध 'अर्थबोधपत्रिके'च्या पुढील अंकात आपल्या भेटीस येईल. या अंकातील दुस-या लेखात आलेख चितारलेला आहे तो अगदी अलीकडेच दिवंगत झालेल्या एक ज्येष्ठ आणि नामवंत संशोधिका प्रा. कुमुदिनी दांडेकर यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा.



'लोकसंख्याविज्ञान' या अभ्यास व संशोधन प्रांताची आपल्या देशातील ज्ञानविश्वात पायाभरणी करणा-यांच्या आद्य पिढीतील विलक्षण प्रगल्भ अभ्यासक-संशोधक म्हणून प्रा. दांडेकर ख्यातकीर्त होत्या. आजच्या पिढीतील तरूण अभ्यासकांनी त्यांचेही नावही ऐकले नसण्याची शक्यताच अधिक. गोखले अर्थशास्त्र संस्थेतील लोकसंख्याशास्त्र विभागाची घडी बसवणा-या प्रा. दांडेकर त्याच संस्थेत पुरी तीन दशके लोकसंख्याशास्त्राचे संशोधन-अध्ययन-अध्यापन यांत मग्न राहिल्या. प्रा. दांडेकर यांच्याच मार्गदर्शनाखाली डॉक्टरेटचा अभ्यास केलेल्या डॉ. संजीवनी मुळ्ये यांनी प्रा. दांडेकर यांच्या सकस व बहुमिती संशोधनविश्वाचा परिचय घडवत असतानाच त्यांचे व्यक्तिमत्त्वविशेषही लेखात शब्दबद्ध केलेले आहेत. डॉ. रेगे यांनी त्यांच्या लेखात मांडलेले भारतीय बँकिंगचे वास्तवदर्शन तर, डॉ. मुळ्ये यांनी अक्षरांकित केलेले प्रा. दांडेकर यांचे व्यक्तिदर्शन 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांना रोचक वाटेल, असा विश्वास वाटतो. ●●

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आर्थिक

# भारतीय बँकिंग उद्योग
## वास्तव आणि आव्हाने

● डॉ. रूपा रेगे - नित्सुरे

आपल्या देशातील सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या बँका अलीकडील पाच ते सहा वर्षांपासून थकित कर्जांच्या समस्येचा सामना करत आहेत. ही समस्या गंभीर स्वरूपाची अशीच आहे. थकित कर्जांचा बोजा माथ्यावर चढलेल्या काही सरकारी बँकांची स्थिती तर अशी आहे की, त्यांच्या थकित कर्जांचे प्रमाण त्या बँकांचे भागभांडवल व मिळकतीच्या रक्षित अंशाच्या बेरजेपेक्षाही अधिक आहे. केवळ सरकारचा भक्कम आधार पाठीशी आहे म्हणूनच आपले बुड स्थिर राखणे अशा बँकांना शक्य बनते आहे. आपल्या देशातील केवळ बँकिंग उद्योगाच्या दृष्टीनेच नव्हे तर, एकंदरच अर्थकारणाच्या प्रकृतीच्या दृष्टीनेही ही सगळीच परिस्थिती गांभीर्याने हाताळावी अशी आहे. आपल्या देशातील बँकिंग उद्योगात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे जे महत्त्व व स्थान आहे ते नीट समजावून घेतले की, या समस्येचे निराकरण शक्य तितक्या जलदीने घडून येणे का व कसे आवश्यक आहे, त्याची खात्री पटावी.

आपल्या देशातील बँकिंग उद्योगाची आजघडीला जी काही एकंदर मालमत्ता आहे त्यांतील जवळपास दोन तृतीयांश टक्के मालमत्ता सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या मालकीची आहे. असे असूनही, बँकिंग उद्योगाच्या एकंदर नफ्यामध्ये मात्र सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या नफ्याचे योगदान एक तृतीयांशापेक्षाही कमीच भरते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या मालमत्तेवर त्यांना मिळणारा परतावा हा खासगी बँकांना त्यांच्या मालमत्तेवर मिळणा-या परताव्याच्या अवघा एक चतुर्थांश इतकाच दिसतो. सध्या चालू असलेल्या २०१६-१७ या वित्तीय वर्षाच्या एप्रिल ते जून या अलीकडेच सरलेल्या पहिल्या तिमाहीसाठीची काही आकडेवारी या संदर्भात मननीय ठरावी.



चालू वित्तीय वर्षातील पहिल्या तिमाहीसाठीची आकडेवारी बघितली तर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या थकित कर्जांचे प्रमाण एकूणांत जवळपास १०.४ टक्क्यांवर पोहोचल्याचे दिसते. थकित कर्जांच्या बरोबरीनेच, समजा, बँकांनी फेरआखणी केलेल्या कर्जांचाही आपण विचार केला तर हीच टक्केवारी एकदम १५.२ टक्क्यांपर्यंत उंचावते. दुसरीकडे, नेमक्या याच बाबतीत आपल्या देशात कार्यरत असलेल्या खासगी बँकांची कामगिरी नजरेत भरते. थकित कर्जांचे एकूणांतील प्रमाण खासगी बँकांच्याबाबतीत दिसते ते अवघे ३.१ टक्के इतकेच. अगदी, फेरआखणी केलेल्या कर्जांचीही रक्कम थकित कर्जांमध्ये मिळवली तरी खासगी बँकांच्याबाबतीत ते प्रमाण साडेचार टक्क्यांवर सरकत नाही. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या दुबळ्या कर्जांचे त्या बँकांच्या निव्वळ मूल्याशी असलेले प्रमाण बघायला गेले तर ते भरते १७० टक्के इतके अवाढव्य. खासगी बँकांच्याबाबतीत हेच प्रमाण दिसते अवघे २७ टक्के इतके. सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि खासगी बँका यांच्या कामगिरीतील डोळ्यांत भरण्याजोगी तफावत मनावर बिंबते ती या ठिकाणी.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची कामगिरी आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत त्यांच्याकडून अपेक्षित असलेली भूमिका यांवर या सगळ्याचा प्रतिकूल परिणाम होतो. अर्थव्यवस्थेतील बिगर शेती उद्योगधंद्यांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून केल्या जाणा-या कर्जपुरवठ्यातील वाढ २०१४ सालापासून पांगुळते आहे. त्यांच्या तुलनेत, नव्यानेच कार्यरत झालेल्या खासगी बँकांद्वारे बिगर शेती उद्योगधंद्यांना केल्या जाणा-या पतपुरवठ्याचा कल चढता वेग दर्शवतो. सार्वजनिक क्षेत्राकडून आपल्या देशातील संघटित कॉर्पोरेट उद्योगक्षेत्राला केल्या जाणा-या कर्जपुरवठ्यातील वाढच काय ती ढेपाळते आहे, असेही अजिबातच नाही. तर, आपल्या अर्थव्यवस्थेतील लघु व मध्यम आकारमानाच्या उद्योगव्यवसायांना सरकारी बँकांकडून केल्या जाणा-या पतपुरवठ्यातील वाढीचा वेगही मलूल पडतो आहे. वास्तविक पाहता, अर्थव्यवस्थेतील तुलनेने दुर्बळ व अ-लक्षित, उपेक्षित घटकांना परपुरवठा करण्याबाबत सरकारी बँकांनी सरकारच्या हातात हात गुंफून आजवर कायमच सकारात्मक भूमिका धारण केलेली होती.

## बँकांचे पुनर्भांडवलीकरण

परंतु, घरबांधणी, खासगी कर्जे, दीर्घकालीन वापराच्या ग्राहकोपयोगी जिनसा..अशांसाठी केल्या जाणा-या कर्जपुरवठ्याच्या वाढीचा वेग मात्र या काळातही टिकून राहिलेला दिसून आला. याला सार्वजनिक क्षेत्रातील बँका अथवा खासगी बँका या दोन्हीही अपवाद नव्हत्या, ही बाब या ठिकाणी अधोरेखित करावयास हवी. या क्षेत्रांना होत राहिलेला पतपुरवठा सातत्याने दरसाल सरासरी १८ टक्के दराने अलीकडील काळात वाढता राहिल्याचा अनुभवही आपण घेतला.

सार्वजनिक बँकांचे एकंदर भारतीय अर्थकारणातील महत्त्व निरपवाद आहे. बँकिंग उद्योगाच्या मालमत्तेपैकी सुमारे ७० टक्के मालमत्ता सरकारी बँकांच्या मालकीची आहे. अशा परिस्थितीत, सार्वजनिक बँकांचे महत्त्व व भूमिका खासगी बँकांचे क्षेत्र स्वतःकडे घेईल, याची शक्यता नजीकच्या भविष्यात तरी दिसत नाही. या ठिकाणी आपण एक गोष्ट नीट समजावून घ्यावयास हवी. ती अशी की, भारतीय अर्थव्यवस्थेतील वित्तव्यवहार आणि वित्तपुरवठा हा आजही मुख्यतः बँकिंग क्षेत्रावरतीच निर्भर आहे. अर्थव्यवस्थेतील आर्थिक व्यवहारांना, व्यावसायिकांना, उद्योगधंद्यांना आज कर्जांचा पुरवठा होतो तो मुख्यतः बँकांकडूनच. भांडवल बाजारातून भांडवल उभे करण्याची संस्कृती, व्यवस्था व क्षमता व्यापक प्रमाणावर आपल्या अर्थव्यवस्थेत आजही नाही. भांडवल बाजारातून भांडवल उभारणी करणे हे प्रगत देशांत सरसहा घडते. परंतु, आपल्या देशात पतपुरवठा हा मुख्यतः बँकांद्वारेच केला जातो. त्याबाबतीत भारत आजही जर्मनी, जपान यांसारख्या देशांच्या पंगतीत बसतो. उद्योगधंद्यांचे स्वरूप, त्यांतील विविधता, त्यांचे स्थानांकन, उद्योगव्यवसायांचे प्रकार, त्यांचे कायदेशीर स्वरूप (उदाहरणार्थ, उद्योग नोंदणीकृत आहे अथवा नाही), व्यवसायांचे आकारमान, व्यवस्थापन प्रणाली, संघटित उद्योगक्षेत्राबरोबर असलेले त्यांचे व्यावसायिक संबंध, उद्योगांची पतधारणक्षमता... अशा अनंत बाबींमध्ये उदंड वैविध्य असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेतील उद्योजक-व्यावसायिकांच्या कर्जविषयक गरजाही तितक्याच विविक्षित आहेत. अशा परिस्थितीत, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आज निभावत असलेली भूमिका खासगी बँका वठवू शकतील हे अवघड दिसते.



सरकारी बँकांना जो नफा होतो त्यांतून भागभांडवलावरील परतावा अदा केल्यानंतर जो काही अवशेष उरतो त्यांतील काही भाग हा बँका स्वतःपाशी ठेवून घेतात. बँकांच्या मिळकतीचा असा हा अवशिष्ट भाग आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे भागभांडवल या दोहोंचा समावेश बँकांच्या भांडवलाचा प्रथम स्तर (टिअर वन कॅपिटल) तयार होतो. सार्वजनिक क्षेत्रातील काही बँकांच्या थकित कर्जांचे प्रमाण त्यांच्या भांडवलाच्या या प्रथम स्तरापेक्षाही अधिक झालेले असल्याने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा भांडवली पाया पुनश्च एकवार मजबूत बनवणे क्रमप्राप्त बनलेले आहे. बँकिंगच्या तांत्रिक परिभाषेत या बँकांचे पुनर्भांडवलीकरण (रिकॅपिटलायझेशन ऑफ बँक्स) असे म्हणतात. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या भांडवलाचा प्रथम स्तर बुलंद बनवण्यासाठी २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वित्तीय वर्षांदरम्यान अदमासे एकंदर १ लाख ७० हजार कोटी ते २ लाख १० हजार कोटी रुपयांची गरज भासणार आहे. 'इक्रा'सारख्या (ICRA) प्रतिष्ठित पतमानांकन संस्थेनेच या अंदाजी रकमेचे गणित मांडलेले आहे.

'इक्रा'सारख्या संस्थाच अशा प्रकारचे अंदाज मांडू शकतात, ही बाब या ठिकाणी आवर्जून नमूद करावयास हवी. कारण, अशा प्रकारची गणिते मांडण्यासाठी आवश्यक असणा-या सांख्यिकीपर्यंत तसेच अन्य माहितीपर्यंत पोहोचणे हे केवळ त्यांनाच शक्य असते. ज्या माहितीच्या आधारे अशा प्रकारचे ठोकताळे बांधले जातात ती सारी माहिती व आकडेवारी बँकांपाशीच तयार असते. 'इक्रा'सारख्या संस्थांनाच काय तो अशा माहितीला 'ॲक्सेस' मिळतो. जनसामान्यांना ती अथवा तशा प्रकारची माहिती उपलब्ध होणे दुरापास्तच असते.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या प्रथम स्तरातील भांडवलाची पूर्ती करण्यासाठी २०१६-१७, २०१७-१८ आणि २०१८-१९ या तीन वित्तीय वर्षांदरम्यान सरकारने ७० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आता, १ लाख ७० हजार कोटी ते २ लाख १० हजार कोटी रुपये कोठे आणि सरकारने तरतूद केलेले ७० हजार कोटी कोठे, असा प्रश्न कोणासही पडावा हे ओघानेच येते. मग, सार्वजनिक क्षेत्रातील बँका निकड असलेली रक्कम भांडवल बाजारातून का उभी करत नाहीत, असे कोणीही विचारेल.

**बदलती मार्गदर्शक तत्त्वे व कार्यपद्धती**

बँकांच्या मालमत्तेची म्हणजेच पर्यायाने बँकांनी वाटप केलेल्या कर्जांची दुबळी स्थिती आणि बँकांची निस्तेज नफाप्रदता या दोन बाबी भांडवल बाजारातून भांडवल उभारणीचा पर्याय चाचपून पाहण्याच्या मार्गातील मुख्य अडथळे शाबीत होतात. आपल्या देशातील सार्वजनिक बँकांच्या संदर्भातील आजघडीचा विवंचनेचा हा एक मुख्य विषय होय.

या व्यतिरिक्त अन्य बाबीही आहेतच. बँकांच्या भांडवली पायासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावरील पथदर्शक संस्था व व्यासपीठांनी जारी केलेल्या मानकांचा अंगीकार भारतीय बँकिंग क्षेत्रालाही येत्या काळात करणे भागच आहे. त्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, थकित वा बुडित कर्जापायी आजवर बँकांना निधीची जी तरतूद करावी लागत होती त्यांपेक्षा तब्बल तिप्पट तरतूद येथून पुढील काळात करावी लागणार आहे. म्हणजेच, आपल्या नक्त उत्पन्नातील मोठा भाग बँकांना तशा प्रकारच्या भांडवली तरतुदीसाठी वेगळा काढून ठेवणे भाग आहे. केवळ इतकेच नाही तर, आपापल्या वित्तीय कारभारासंदर्भातील तपशीलाचे प्रगटन करण्यासंदर्भातील अद्ययावत अशा आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रगटन मानकांचा (इंटरनॅशनल फायनान्शिअल रिपोर्टिंग स्टॅन्डर्ड्स्) अंगीकार भारतीय बँकिंग उद्योग १ एप्रिल २०१८ या दिवसापासून करणार आहे. त्या नंतर तर, अदा केलेल्या कर्जांची, समजा, परतफेड झाली नाही तर पडणा-या खड्ड्याची पूर्तता करण्यासाठी बँकांना कराव्या लागणा-या भांडवली तरतुदीमध्ये अधिकच वाढ होईल. केवळ इतकेच नाही तर, अशी तरतूद करण्यासाठी संदर्भ म्हणून वापरल्या जाणा-या मार्गदर्शक तत्त्वांमध्येदेखील बदल होऊ घातलेले आहेत. प्रत्यक्षात झालेल्या तोट्याच्या आकारमानानुसार भांडवली तरतूद करण्याची कार्यपद्धती बँका सध्या अवलंबतात. १ एप्रिल २०१८ नंतर, प्रत्यक्ष नव्हे तर अंदाजित तोट्याच्या मानाने भांडवली तरतूद करणे बँकांना अनिवार्य ठरणार आहे.

त्या दृष्टीने रिझर्व्ह बँक अधिकच जागरूक बनते आहे. वाटप केलेल्या कर्जांच्या परतफेडीसंदर्भातील संभाव्य धोक्यांची लक्षणे (म्हणजेच, ती कर्जे थकित वा बुडित बनतील किंवा कसे) बँकांनी अगोदरच हेरावीत अशा पद्धतीने रिझर्व्ह बँक मार्गदर्शक तत्त्वे नव्याने जारी करते आहे.



पतपुरवठा हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील एक अतिशय कळीचा घटक होय. त्या अर्थाने, भारतीय अर्थव्यवस्थेत पुरेसा व जलद पतपुरवठा जारी राखून दमदार आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला हातभार लावण्यासाठी सार्वजनिक बँकांना सक्षम बनवायचे तर त्यांचे अतिशय मोठ्या प्रमाणावर पुनर्भांडवलीकरण घडवून आणणे अनिवार्य ठरते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या भांडवलाचा प्रथम स्तर मजबूत करण्याच्या दृष्टीने सरकार सध्या दोन आघाड्यांवर विचार करताना दिसते. सार्वजनिक क्षेत्रातील ज्या बँका तुलनेने दुर्बळ आहेत त्यांचे सक्षम व बळकट बँकांमध्ये विलिनीकरण वा सामिलीकरण घडवून आणणे, हा झाला त्या दोहोंतील एक पर्याय.

तर, निर्गुंतवणुकीकरणाद्वारे सार्वजनिक क्षेत्रातील काही बँकांमध्ये असलेले आपले भागधारण कमी करणे, हा दुसरा पर्याय सरकारसमोर राहतो. अर्थात, हा पर्याय अंगीकारण्याबाबत सरकार फार उत्सुक असेल, असे अजिबातच नाही. कारण, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील आपली मालकी कोणतेही सरकार सहजासहजी कधीच सोडत नसते व सोडणे अवघडही दिसते-भासते. कारण, कितीही नाही म्हटले तरी बँका हे कोणत्याही सरकारच्या दृष्टीने त्याची धोरणविषयक दृष्टी पुढे रेटण्यास पूरक-उपकारक असे आयुध वा साधन असते. मुळात, कोणतीही राजकीय यंत्रणा कोणत्याही व्यवस्थेवरील आपले नियंत्रण ढिले करण्यास वा मागे घेण्यास मुळातच नाखूष असते. आपल्या राजकीय लाभासाठी बँकिंगचा वापर करण्याचा मोहवजा प्रघात केवळ आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेतच दिसतो, असे मानण्याचे कारण नाही. जवळपास सगळ्यांच आशियाई देशांमध्ये हेच चित्र दिसते. बँकिंग व्यवहार व उद्योगासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचलीत असणारी कार्यपद्धती अंगीकारण्याच्या दृष्टीने भारतीय बँकिंग उद्योगाची तयारी अजूनपावेतो झालेली नाही, हाच या सगळ्याचा गोषवारावजा इत्यर्थ.

थकित वा बुडित कर्जांचे जे आव्हान सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या पुढ्यात अलीकडील काळात कडवे बनलेले आहे, त्याचा हा परामर्श झाल्यानंतर आता त्यांमागील कारणांचा परिचय करून घेणे उचित ठरेल.

**थकित कर्जे फुगण्यामागील कारणे...**

थकित वा बुडित कर्जांचा अंगावर येणारा हा डोंगर नानाविध कारणांपायी तयार झालेला दिसतो.

**(१) प्रशासकीय ढिलाई व ढासळती नीतिमत्ता :** प्रवर्तकांची ढिलाई, बेफिकिरी, अनियमितता, प्रशासनातील ढिसाळपणा आणि मुख्य म्हणजे नैतिकतेच्या अंकुशाचा कारभार हाकणा-यांच्या मन व बुद्धीवरून ढळलेला रोख हे थकित वा बुडित कर्जांची रास उभी होण्यामागील पहिले प्रधान कारण मानावे लागेल. ज्या कर्जधारकांचा कर्जांच्या परतफेडीबाबतचा पूर्वेतिहास संशयास्पद वा असमाधानकारक आहे, अशा ऋणकोंना नव्याने कर्जे मंजूर करणे, ज्या संघटित उद्योगांनी वा कॉर्पोरेट क्षेत्रातील बलदंडांनी पूर्वीची कर्जे रखडवलेली आहेत, कर्ज अदा करण्यास जे उद्योग अयोग्य गणले जातात अशांना सरसहा कर्जे मंजूर करणे हे बँकांच्या मुळावर येतेच. सर्वसाधारण कारभार हा काही किमान व्यावसायिक संकेत व नीतिमत्ता सांभाळून हाकावयाचा असतो, याचे भान बँकांच्या कारभा-याकडून आणि/अथवा प्रवर्तकांकडून राखले न जाणे, ही या सगळ्याच्या मुळाशी असलेली समस्या होय.

**(२) वित्तीय अरिष्ट व बाजारभावांतील घसरण :** औद्योगिक क्षेत्रामध्ये मुख्य उत्पादन घटक या स्वरूपात वापरल्या जाणा-या जिनसांच्या बाजारभावांत आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत अलीकडील काळात एकंदरीनेच घसरण अनुभवास येत असल्यानेही बँकांची कर्जे थकलेली दिसतात. यात आघाडीवर आहेत ती खनिज उत्पादने, म्हणजेच मुख्यतः खाणउद्योग. त्यांतल्या त्यांतही पुन्हा अधिक बिकट परिस्थिती दिसते ती पोलादाची. २००८ सालानंतर जागतिक बाजारपेठेत ठाण मांडून बसलेले वित्तीय अरिष्ट हे अलीकडील काळातील एक मुख्य कारण. मागणीच नसल्यामुळे पोलादासारख्या जिनसांचे बाजारभाव नरमलेले दिसतात. त्याआधीही, चीनसारखा पोलादाचा उद्दाम उत्पादक उत्पादन खर्चापेक्षाही कमी दराने (यालाच आर्थिक परिभाषेमध्ये 'डम्पिंग' असे म्हटले जाते) अनेक देशांतील बाजारपेठांत आपले पोलाद ओतत होताच. बाजारभाव घसरल्याने संबंधित उत्पादकांच्या नफाप्रदतेला फटका बसून त्याची झळ कर्जांच्या परतफेडीला बसताना दिसते.



**(३) शासकीय दिरंगाई व लालफितीचा काच :** २०११ सालातील ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात '२-जी'चा घोटाळा उघडकीस आला आणि तिथपासून ते थेट २०१४ सालातील मे - जून महिन्यापर्यंत धोरणलकव्याने सरकारच्या कारभारातील चैतन्य पार लोपूनच गेले. त्यांतून प्रशासनाची कार्यक्षमता व निर्णयप्रणाली खचली आणि त्याचा मोठा फटका उद्योगांना बसला. नियामकांकडून भराभर मंजु-याच मिळेनाशा झाल्या. पर्यावरणीय बाबतींत अनुमती मिळणे, भूसंपादनाला हिरवा कंदिल दाखवला जाणे, वनखात्याकडून 'ना हरकत' प्रमाणपत्रे पदरी पडणे, वहिवाटीचे हक्क प्राप्त होणे, उपरोक्त कोणत्याही बाबीसंदर्भात बखेडा उत्पन्न झाल्यास त्यावर तोडगा शोधून काढणारी कोणतीही संस्थात्मक वा व्यवस्थात्मक प्रणाली अस्तित्त्वातच नसणे... अशांमुळे प्रकल्पांची चाके रुतून बसली. साहजिकच, अंमलबजावणी खोळंबल्याने प्रकल्प पूर्ततेस जाईनात. त्यांत गुंतवलेले भांडवल अडकून बसले. परतावा मिळेना. या सगळ्याचा ताण कर्जांच्या परतफेडीवर यावा हे मग ओघानेच आले.

**(४) शासकीय धोरणांतील बदल व धरसोड :** दूरसंचार कंपन्यांना वाटप झालेले परवाने एका फटक्यात रद्दबातल ठरवणे, कोळसा तसेच कच्च्या पोलादाच्या खाणींवर बंदी जारी करणे... यांसारख्या शासकीय धोरणांतील बदलांचा, फेरविचारांचा फटका त्या त्या क्षेत्रातील उद्योगांच्या माध्यमातून बँकांना बसत राहिला. कोळसा खाणींवर बंदी जारी झाल्याने कोळशाचे उत्पादन खुंटले. त्याची झळ पोहोचली वीज, पोलाद यांसारख्या उत्पादनांच्या निर्मात्यांना. अपुरा पुरवठा व परिणामी जाणवणारी दरवाढ या दोहोंपायी उत्पादनावर आच आली आणि कर्जांची परतफेड रखडली.

**(५) अनियमित पावसाची सलग तीन वर्षे :** २०१३, २०१४ आणि २०१५ ही तीनही वर्षे अनियमित पावसाची ठरली. पर्जन्यवृष्टीचे मान देशभरात सर्वत्र सारखे राहिले नाही. पावसाचे वेळापत्रकही विस्कटले. हे कमी होते म्हणून की काय, गारपीट, अवकाळी पाऊस यांचाही फेरा झाला. परिणामी, खरीपाचे तीन हंगाम गेले. खास करून ट्रॅक्टरसारखी शेतीची अवजारे, पीककर्जे, मळणी-उफणणी यंत्रे, सिंचन अशांसाठी घेतलेली कर्जे फेडणे शेतकरीवर्गाला दुष्कर बनले. कर्जे थकली. बँका कुचंबल्या.

या सगळ्यांतून आपल्या देशातील शेतकरी सावरला तो २०१६ सालातील पावसाळा चांगला झाल्याने. परंतु, आता केंद्र सरकारने नोटाबंदीचे जे पाऊल अवचितच उचलले त्याचा फटका पुन्हा शेतकरी वर्गालाच बसतो आहे. याचा काही ना काही परिणाम हा बँकांकडून घेतलेल्या कर्जांच्या परतफेडीवर जाणवेलच. यंदा खरीपाचा हंगाम चांगला झाला. शेतीमध्ये उत्पादन झाले खरे परंतु नोटाबंदीपायी देशाच्या ग्रामीण भागांत तुलनेने अधिक कोंडी झाली. शेतमालाची खरेदीच सावटाखाली आली. त्यांमुळे, शेतात पिकलेला माल बाजारात विकून घेतलेल्या कर्जांचे हप्ते त्या कमाईतून फेडण्याची शक्यताही अंधुकली. दुसरे म्हणजे, हातात रोकडच नसल्याने शेतकरी वर्गाला विवंचना जाणवते आहे ती रबीच्या हंगामाची तयारी तडीस नेण्याची. या सगळ्यांची परिणती पिकांची एकंदर चार चक्रे विस्कळीत होण्यात घडून येण्याने बँकांना त्याचा चिमटा बसावा, हे स्वाभाविक ठरते. परिणामी, नोटाबंदीचा निर्णय भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीस दीर्घकालात उपकारक शाबीत झाला तरी त्या निर्णयाची ही वेळ मात्र चुकीची होती वा आहे, असे म्हणण्यावाचून पर्याय नाही.

(६) **बँकांच्या निर्णयप्रक्रियेत सरकारचा हस्तक्षेप :** सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये सरकार हाच प्रधान भागधारक असल्याने सरकारी बँकांमधील निर्णयप्रक्रियेत सरकारचा हस्तक्षेप राहावा, हे स्वाभाविकच ठरते. २००८ साली जागतिक अर्थव्यवस्थेत उद्‌भवलेल्या वित्तीय अरिष्टाची झळ भारतीय अर्थव्यवस्थेस बसू नये या दृष्टीने सरकारने उदार व विस्तारशील अशी राजकोषीय व पैसाविषयक धोरणे राबविली. भारतीय अर्थव्यवस्थेतील मागणी टिकून राहावी यासाठी भरभक्कम सरकारी खर्चाची इंजेक्शने टोचली. पायाभूत सेवासुविधांची निर्मिती करणा-या उद्योगांना उदारहस्ताने कर्जे देण्याबाबत बँकांना प्रोत्साहन दिले. त्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनुरूप बदल घडवून आणले. परंतु, आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत अनेकानेक कारणांपायी देशी अर्थव्यवस्थेने अपेक्षेइतका तकवा दाखवला नाही. या आधी म्हटल्याप्रमाणे पर्यावरणविषयक मंजु-या, भूसंपादन यांसारख्या बाबतींतील विलंबापायी प्रकल्प रखडले. परिणामी, प्रकल्पांसाठी कर्जे उचललेल्या कंपन्या अडचणीत आल्या. साहजिकच बँकाही घुसमटल्या.



(७) **बँक अधिका-यांच्या प्रेरणा व विवंचना :** आर्थिक घडामोडींसंदर्भातील एखाद्या गृहीतकानुसार घेतलेला एखादा निर्णय पुढील काळात, परिस्थिती अपेक्षेनुसार न राहिल्याने, अपेक्षित परतावा वा निष्पत्ती दाखवू शकला नाही तर विनाकारण चौकश्या व अभियोगांचे झंझट मागे लागावयाचे, या भीतीवजा आशंकेपायी सार्वजनिक क्षेत्रामधील बँकांच्या वरिष्ठ अधिका-यांचे मनोधैर्य खच्ची होण्यातून संबंधित बँकेच्या वा बँकांच्या कारभाराची गुणवत्ता उणावून त्याचा प्रतिकूल परिणाम कामकाजाच्या सरासरी गुणवत्तेवर घडून येतो. खास करून केंद्रिय गुन्हेअन्वेषण विभाग (सीबीआय) आणि केंद्रिय दक्षता आयोग (सीव्हीसी) या दोहोंकडून केल्या जाणा-या चौकश्यांचा ससेमिरा मागे लागण्याच्या शक्यतेला सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे अधिकारी विशेषच बिचकतात. त्यांतून, एकतर निर्णय शक्यतो लांबणीवर टाकण्याची अथवा होता होईतो निर्णयच न घेण्याची मानसिकता बळावते. याचा थेट परिणाम बँकांच्या सरासरी कार्यक्षमतेवर घडून येतो.

(८) **भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेली आढावा प्रणाली :** बँकांनी अदा केलेल्या कर्जांच्या, म्हणजेच पर्यायाने, बँकांच्या मालमत्तेच्या गुणवत्तेचा आढावा घेण्याची एक नवीनच प्रणाली डॉ. रघुराम राजन हे भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर असताना २०१५ सालातील ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांपासून व्यवहारात लागू करण्यात आली. बँकांच्या थकित वा बुडित कर्जांचे प्रमाण ज्या गतीने वाढत होते, अशा बुडित कर्जांसाठी करावयाच्या वित्तीय तरतुदीची निकड जसजशी उंचावत होती, परिणामी कर्जवाटप करण्याच्या बँकांच्या क्षमतेची जी व जशी हानी होत होती ती बघता अशी काही तरी व्यवस्थांतरात्मक उपाययोजना करणे रिझर्व्ह बँकेस अनिवार्यच बनलेले होते. ज्या कर्जांची परतफेड वा संबंधित कर्जदाराची परतफेडविषयक क्षमता संशयास्पद अथवा दुबळी वाटते आहे अशा कर्जांचा लाग संबंधित बँकेला किंवा बँकांना लगोलग लागावा यासाठी रिझर्व्ह बँकेचे तत्कालीन गव्हर्नर डॉ. रघुराम राजन विशेषकरून आग्रही होते. अशी कर्जे आणि/अथवा असे कर्जदार हेरून त्यांच्या कारभारावर नजर ठेवली जावी, त्यांना अदा केलेल्या कर्जांपोटी वित्तीय तरतूद अधिक मात्रेने करण्यात यावी... अशा काही बाबींचा आढावा या नवीन प्रणालीमध्ये अंतर्भूत होता.

सार्वजनिक क्षेत्रातील बँका जोखीम पत्करण्याबाबत अलीकडील काळात नाखूष दिसण्यास हीच आढावाप्रणाली बहुशः कारणभूत ठरलेली आहे. बँकांच्या कामकाजाचा सगळा भर आज दिसतो तो पूर्वी दिलेल्या कर्जांच्या वसुलीवर. आपल्या कार्यकारी खर्चांमध्ये कपात घडवून आणणे, हा बँकांच्या कार्यक्रमपत्रिकेवरील दुसरा महत्त्वाचा मुद्दा दिसतो. तुलनेने कमी खर्चिक अशा ठेवींचे संचयन करणे, हे तिसरे काम बँकांच्या प्राधान्यक्रमात विराजमान आहे. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे, कर्जवाटप आणि पतपुरवठा ही बँकांची जी दोन मुख्य गाभाकर्तव्ये त्यांच्यावरील बँकांचा 'फोकस' आताशा ढळलेला वाटतो.

**थकबाक्यांच्या वसुलीची कार्यपद्धती**

थकित अथवा बुडित कर्जांच्या वसुलीसाठी अलीकडील काही वर्षांत भारतीय रिझर्व्ह बँकेने नाना प्रकारची पावले उचललेली दिसतात. त्यांचे स्वरूप जाणून घेणे उपयुक्त ठरतेः

(१) **कर्जवसुली लवाद :** थकित कर्जांची वसुली करण्यास वेग येण्याच्या दृष्टीने लवादांची स्थापना करण्याची व्यवस्था आपल्या देशात १९९३ सालापासूनच कार्यरत आहे. अगदी अलीकडेच सहा लवाद नव्यानेच नियुक्त करण्यात आले. ३१ डिसेंबर २०१५ रोजी एकंदर ३३ लवाद कार्यरत होते. तब्बल ६९ हजार ६६० प्रलंबित प्रकरणे त्यांच्या पुढ्यात आहेत. कर्जवसुलीचे एखादे प्रकरण निकाली काढण्यास सरासरीने लवादास पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी लागतो. निकालासाठी लागणारा असा सरासरी प्रदीर्घ काळ, प्रलंबित प्रकरणांची संख्या आणि कार्यरत असलेल्या लवादांची संख्या बघता, हे काम नजीकच्या भविष्यात आटोपणारे नाही, याची कल्पना येते.

(२) **थकबाकीदारांची मालमत्ता जप्तीचा कायदा :** कर्जांची थकबाकी ठेवणा-या कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार संबंधित बँकेला अथवा बँकांना देणारा कायदा सरकारने २००२ साली पारित केला. "सिक्युरटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स् ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट" असे त्या कायद्याचे पूर्ण नामरूप. हा कायदा मोठा वैशिष्ट्यपूर्ण आहे.



थकबाकीदारांच्या मालमत्तेवर टाच आणून संबंधित बँक ती जप्त करत असताना त्यात न्यायालयीन हस्तक्षेप होऊ नये, अशी तरतूद या कायद्यात करण्यात आलेली आहे. ब्रिटन व अमेरिकेतही अशा प्रकारचे कायदे आहेत. परंतु, तिथे असलेले कायदे आणि आपल्या देशात विद्यमान असलेला कायदा या दोहोंत एक महत्त्वाचा फरक आहे. तो असा की, थकबाकीदारांची केवळ व्यावसायिकच नव्हे तर खासगी मालमत्तादेखील जप्त करण्याचा अधिकार आपल्या देशातील कायदा संबधित बँकेला बहाल करतो. ब्रिटन वा अमेरिकेतील कायद्यांत तशी तरतूद नाही. बँकांनी अशा प्रकारे जप्त केलेली मालमत्ता त्यांच्याकडून संपादन करून संबंधित थकबाकीदाराकडून थकित कर्जाची वसुली करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेणा-या खास अशा 'मालमत्ता फेररचना कंपन्यां'ची (ॲसेट्स् रिकन्स्ट्रक्शन कंपन्या - एआरसीज्) स्थापनाही या कायद्यांतर्गत रीतसरपणे करण्यात आली.

मात्र ही यंत्रणा प्रत्यक्ष व्यवहारात तितकीशी यशस्वी ठरलेली दिसत नाही. त्याला कारणेही विविध आहेत. एकतर, न्यायालयीन प्रक्रिया विलक्षण वेळखाऊ असते. दुसरे म्हणजे, मोठ्या रकमा थकवणा-यांची जप्त केलेली मालमत्ता संपादन करून ती दांडगी कर्जे यथावकाश वसूल करण्यासाठी ज्या भक्कम व विस्तृत भांडवली पायाची गरज असते असा सज्जड भांडवली पायाच अनेक कंपन्यांपाशी मौजूद नाही. अनेकदा उचललेल्या कर्जाच्या मूल्यांकनाबाबतच धनको आणि ऋणकोंमध्ये एकवाक्यता नसते. यांतील सगळ्यांत कळीची अडचण आहे ती निराळीच. कर्जदारांनी उचललेल्या कर्जांना दिलेला जामीन हा एक तर जमिनीच्या स्वरूपातील असतो वा अन्य एखाद्या स्थावर मालमत्तेच्या स्वरूपातील. या स्वरूपातील जामीन मालमत्ता जप्त करून यथावकाश तिची विक्री करण्याची वेळ येते तेव्हा तिला बाजारात फारशी किंमत मिळतच नाही. त्यांमुळे, जप्त केलेली जामीन मालमत्ता विकून कर्जाची थकबाकी वसूल करण्याचे सारेच गणित कोलमडते. कर्जांच्या वसुलीबाबतची प्रलंबित प्रकरणे वेगाने निकालात निघावीत या दृष्टीने या कायद्यात तसेच कर्जवसुली लवादविषयक कायद्यात सरकारने सुधारणा घडवून आणलेल्या आहेत.

(३) **कॉर्पोरेट कंपन्यांच्या कर्जांची फेररचना :** मोठ्या, संघटित कॉर्पोरेट उद्योगांच्या थकलेल्या कर्जांची वसुली करण्यासाठी या पर्यायाची योजना करण्यात आली. परंतु, या पर्यायालाही यशप्राप्ती झाली ती मर्यादितच. इथे व्यवहारात मुख्य प्रश्न येताना दिसतो तो थकित कर्जांच्या फेररचनेमागील प्रेरणेचा. अडचणीत गवसलेल्या संबधित उद्योगाच्या व्यावसायिक क्षमता पुनश्च एकवार संवर्धित व्हाव्यात हा हेतू थकित कर्जांच्या फेररचनेमागे अभावानेच दिसून येतो. फेररचनेमागे प्रेरणा बलवत्तर असते ती थकित कर्जाचे वर्तमानकालीन निव्वळ वास्तव मूल्य जतन करण्याची. परिणामी, कर्जांच्या फेररचनेद्वारे थकबाकीदाराला काहीसा दिलासा मिळाला तरी तो अल्पकालीकच शाबीत होतो.

(४) **संयुक्त धनको व्यासपीठ योजना :** भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांच्या कार्यकालात या योजनेचे प्रवर्तन करण्यात आले. ताणाखाली आलेली अथवा येत असलेली कर्जे आणि संबंधित कर्जदार प्रथम चरणातच हेरून त्यानंतरच्या अवघ्या दीड महिन्यातच त्या बाबतची उपाययोजना सुचविली जावी, हा या योजनेमागील प्रधान हेतू. परंतु, ही मात्राही काही सुरळीत लागू पडली नाही. कारण, एखाद्या प्रलंबित कर्जखात्याच्या बाबतीत कशा प्रकारची पावले उचलावीत यांबाबत धनकोंमध्ये एकवाक्यता घडून येणेच अवघड होऊन बसत असे. मात्र, या योजनेचे एक सर्वांत महत्त्वाचे फलित नजरेआड करून चालणार नाही. देशातील विविध बँकांकडून कर्जे उचललेल्या ज्या मोठ्या, संघटित, कॉर्पोरेट उद्योगांची कर्जे थकलेली आहेत त्यांच्या माहितीचा एक मोठा संचयच या निमित्ताने रिझर्व्ह बँकेच्या दप्तरी तयार झाला. संघटित कॉर्पोरेट थकबाकीदारांची अशी 'डेटाबँक' या आधी कधीच कोणीही तयार केलेली नव्हती. प्रत्येक बँकेकडे तिच्या तिच्या थकबाकीदारांची यादी तयार असे. परंतु, एकत्रितरीत्या ती उपलब्ध होत नसे. ते काम या योजनेच्या निमित्ताने सिद्ध झाले. नियामकांचे हात त्यांमुळे बळकट बनले. मुख्य म्हणजे, एखादा ऋणको एखाद्या बँकेच्या खात्यात थकबाकीदार म्हणून नोंदवला जाई तर अन्य एखाद्या बँकेच्या दस्तऐवजात त्याची तशी नोंदच नसे. आता, रिझर्व्ह बँकेच्या भिंगाखालीच हा सारा माहितीसाठा सुसज्ज आहे.



(५) **कर्ज नवरूप योजना :** बँकांतर्फे दिली जाणारी कर्जे ही वास्तविक पाहता बँकांची मालमत्ता गणली जाते. तर, ठेवीदारांकडून बँका ज्या ठेवी स्वीकारतात त्यांद्वारे बँकांच्या ताळेबंदात देणी निर्माण होत असतात. बँकांतर्फे वाटप केली जाणारी कर्जे वेगवेगळ्या मुदतीची असतात. त्याचप्रमाणे ठेवींची मुदतही निरनिराळी असते. मोठमोठ्या भांडवली गुंतवणुकीचे महाकाय प्रकल्प उभे करण्यासाठी बँकांकडून घेतलेली कर्जे दीर्घ मुदतीची असतात. अशी पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीसाठी, मोठ्या गुंतवणुकीच्या विकासप्रकल्पांसाठी व्यापारी बँका अलीकडे कर्जे देऊ लागलेल्या आहेत. पूर्वी अशा कर्जांच्या पुरवठ्यासाठी आपल्या देशात वेगळ्या वित्तसंस्था कार्यरत असत. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेस हातभार लावणा-या प्रकल्पांना दीर्घकालीक वित्तपुरवठा करणा-या त्या विशेष वित्तसंस्थांना 'डेव्हलपमेन्ट फायनान्सिंग इन्स्टिट्यूशन्स' (डीएफआयज्) असे संबोधले जात असे. आता, त्या वित्तसंस्थांचे काम व्यापारी बँकांनी त्यांच्याकडेच घेतलेले आहे. आता, इथे एक गंमत होते. ती अशी की, मोठमोठ्या भांडवली गुंतवणुकीच्या प्रकल्पांसाठी दीर्घमुदतीची कर्जे निकडीची असतात. प्रसंगी अशा कर्जांचा कालावधी २०-२०, २५-२५ वर्षांचाही संभवतो. मात्र, बँकांमध्ये ठेवल्या जाणा-या ठेवींची मुदत इतकी दीर्घपल्ल्याची नसते. परिणामी, बँकांची मालमत्ता आणि देणी यांच्या कालमुदतीमध्ये विसंवाद निर्माण होतो. त्यांमुळे, मोठ्या प्रकल्पांना दीर्घमुदतीची कर्जे देणे बँकांना कठीण ठरते. या विसंवादावर प्रस्तुत योजनेद्वारे तोडगा शोधलेला आहे. व्यापारी बँकांनी दीर्घमुदतीची कर्जे पाच-पाच वा सात-सात वर्षांच्या उपमुदतीद्वारे अदा करावयाची, अशी ही पद्धत. कर्जे अदा केल्यानंतर दर पाच ते सात वर्षांनी त्यांचा आढावा इथे घेतला जातो. तोपर्यंत त्या प्रकल्पाचे काम कोठवर आलेले आहे, पुढील टप्प्यात त्या प्रकल्पाला कर्जे पुरवणे त्या त्या बँकेला अथवा बँकांना शक्य आहे किंवा नाही, याचा आढावा घेतल्यानंतर संबंधित बँकेने पुढील टप्प्यातील कर्जपुरवठ्याबाबत निर्णय घेणे इथे अपेक्षित आहे. त्या नुसार त्या बँकेने दिलेल्या तशा कर्जांना दर पाच ते सात वर्षांनी पुनर्वित्ताची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. मात्र ज्या प्रकल्पांचे काम पूर्णत्वास गेलेले आहे, अशा प्रकल्पांच्या कर्जांनाच नवरूप प्रदान करण्याची सुविधा उपलब्ध होते.

**(६) कर्जांची व्यूहरचनात्मक फेररचना :** कर्ज उचललेला कॉर्पोरेट कर्जदार थकबाकीदार बनल्यास त्याच्याकडे थकलेल्या कर्जाचे पूर्णतः अथवा अंशतः रूपांतर भागभांडवलामध्ये घडवून आणून पुढील दीड वर्षाच्या काळात त्या कंपनीला नवीन मालक शोधून ती त्याला विकून टाकावयाची व कर्जाची वसुली साध्य करायची, हा या योजनेचा गाभा. आजवर एकंदर २० कंपन्यांच्याबाबतीत संबंधित बँकांनी या पर्यायाचा अवलंब केलेला दिसतो. परंतु, या मार्गाने जाण्यात काही मूलभूत स्वरूपाच्या अडचणी दिसतात. पहिले म्हणजे, थकित कर्जाचे रूपांतर भागभांडवलामध्ये घडवून आणत संबंधित कंपनीचे मालक बनावयाचे व नंतर ती अन्य एखाद्या सक्षम मालकाला विकून आपले कर्ज वसूल करून घेण्यासाठी आवश्यक असलेले व्यावसायिक व व्यावहारिक कौशल्य तसेच सक्षमता बँकांपाशी आहे किंवा नाही हाही एक प्रश्नच होय. दुसरे म्हणजे, समजा एखाद्या बँकेच्या थकबाकीदार कंपन्या औषधनिर्मिती, बांधकाम, संगणकनिर्मिती, तयार कपड्यांचे उत्पादन... अशांसारख्या वेगवेगळ्या उद्योगांत कार्यरत असतील तर त्या त्या उद्योगक्षेत्रात सक्षम असे संभाव्य खरेदीदार कोण असू शकतील ते शोधणे, त्यांच्याशी रुजवात करून थकबाकीदार कंपनीच्या विक्रीचा व्यवहार पूर्ण करणे... अशांसारख्या विविध बाबींसाठी आवश्यक असलेले ज्ञान, माहिती व कौशल्ये बँकांपाशी असतील का, हेही तपासूनच बघावयास हवे.

**(७) थकित कर्जांची सातत्यशील फेररचना :** ही योजना म्हणजे या आधी वरतीच विवरण केलेल्या योजनेचेच हे सुधारित भावंड म्हणता येईल. थकित कर्जांचा बोजा माथ्यावरून उतरवण्यासाठी झगडणा-या कंपन्यांच्या एकंदर थकित कर्जांचा संबंधित बँकांनी बारकाईने प्रथम आढावा घेणे इथे अपेक्षित आहे. त्या कंपनीच्या कारभाराद्वारे अथवा ज्या प्रकल्पासाठी कंपनीने ते कर्ज घेतलेले आहे त्या प्रकल्पाद्वारे कंपनीच्या खात्यावर उत्पन्नाचा जो प्रवाह निर्माण होतो त्याचा अभ्यास करून, त्या उत्पन्नाच्या बळावर एकंदर थकित कर्जापैकी किती रकमेची परतफेड संभाव्य आहे याचा अदमास घेऊन उर्वरित कर्जाचे रूपांतर भागभांडवलामध्ये घडवून आणण्याचा पर्याय या योजनेद्वारे संबंधित बँकेला खुला राखला जातो.



अर्थात, या ठिकाणी एक अट आहे. ती अशी की, कंपनीच्या विद्यमान अथवा भविष्यकालीन उत्पन्नाच्या प्रवाहाद्वारे परतफेड शक्य बनेल अशा कर्जांशांचे प्रमाण एकंदर थकित कर्जामध्ये किमान ५० टक्के इतके तरी असले पाहिजे. म्हणजेच, एकंदर थकित कर्जापैकी निम्म्या कर्जाचेच काय ते रूपांतर भागभांडवलामध्ये घडवून आणण्याची तरतूद या योजनेमध्ये आहे. अर्थात, ही सारी संभाव्यता संबंधित बँकेने अथवा बँकांनीच चाचपून बघावयाची आहे.

थकित कर्जांच्या परतफेडीसाठी बँकांनी तगादा लावलाच तर आपापला ताळेबंद साफसुथरा दिसण्यासाठी बोजाखाली आलेली मालमत्ता विकून कर्जफेड करण्याचा पर्यायही कॉर्पोरेट विश्वातील काही अवलंबताना दिसतात. २०१३ सालापासूनचा विचार केला तर, बोजाखाली आलेली सुमारे एक लाख कोटी रुपयांची मालमत्ता विकून टाकण्याचे ऐलान भारतीय कंपन्यांनी केलेले दिसते. त्यांपैकी ४१ हजार कोटी रुपयांच्या मालमत्तेच्या विक्रीची घोषणा चालू कॅलेंडर वर्षातील जानेवारी ते मे या पाच महिन्यांच्या काळातच केली गेली, असे संबधित आकडेवारी नीट न्याहाळून बघितल्यानंतर आपल्या ध्यानात येते.

हा पर्याय वरकरणी आकर्षक वाटला तरी त्याची दुसरी बाजूही नजरेआड होऊ देता कामा नये. बहुतांश प्रकरणांमध्ये घडताना दिसते ते असे की, हा पर्याय अवलंबायचा म्हटल्यावर तुलनेने त्यांतल्या त्यांत चांगल्या, दर्जेदार, उत्पादक स्वरूपाच्या मालमत्ताच विक्रीला काढल्या जातात. याचाच अर्थ हा की, संबंधित उद्योग अथवा कंपनी ही जतन करण्याजोग्या मालमत्तेलाच व्यवहारात मुकत असते. अर्थात, कोणत्याही पर्यायाची निवड केली तरी त्याचे फायदेतोटे असणारच. त्यांमुळे, व्यवहारात आपल्याला दोन्ही बाजू विचारात घेणे भाग पडत असते.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना भेडसावणा-या थकित अथवा बुडित कर्जांच्या समस्येचे विविध कंगोरे हे असे दिसतात. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे उभ्या बँकिंग उद्योगातील स्थान पाहता हा तिढा सोडवून या बँका पुन्हा एकवार सक्षम पायावर कशा कार्यरत बनतील याचा विचार आपण सगळ्यांनीच आत्मीयतेने करावयास हवा. ●●

स्मरण

# प्रा. कुमुदिनी दांडेकर
## एक प्रयोगशील संशोधिका

● डॉ. संजीवनी मुळ्ये

''आमचा हिंदू धर्म इतका सर्वसमावेशक आहे की, काही काळानंतर कुटुंब नियोजन हा सतरावा संस्कार म्हणून गणला गेला तर मला आश्चर्य वाटणार नाही...'', असे साठ-एक वर्षांपूर्वी परदेशी पाहुण्यांना ठणकावून सांगणाऱ्या प्रा. कुमुदिनी दांडेकर... १९५३ साली कोलकात्याला (तेव्हाचे कलकत्ता) Institute of Tropical Medicine मध्ये एक परिषद भरली होती. दांडेकरबाईंनी त्यांच्या कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रातील कामावर आधारित एक शोधनिबंध त्या परिषदेमध्ये सादर केला होता. त्या वेळी Rockfeller Foundation चे बेलफोर्ड नावाचे एक प्रतिनिधी तिथे उपस्थित होते. तुमच्या हिंदू धर्मात कुटुंब नियोजनाला मान्यता असेल का असा प्रश्न त्यांनी त्या वेळी दांडेकरबाईंना विचारला. त्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दांडेकरबाईंनी वरती उद्धृत केलेल्या शब्दांत दिले होते. कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम त्या वेळी (म्हणजे, १९५१ साली) सरकारी पातळीवर नुकताच प्रवर्तित करण्यात आलेला होता, ही बाब या ठिकाणी आवर्जून ध्यानात ठेवावयास हवी. अशा परिस्थितीत, त्याबद्दल इतक्या खात्रीशीर रीतीने बोलायचे तर त्यासाठी द्रष्ट्याचीच नजर लागते. आज कुटुंब नियोजन हा औपचारिकरीत्या हिंदू कुटुंबातील सतरावा संस्कार बनलेला नसला तरी लोकांची त्या बाबतची स्वीकृती त्याच तोलामोलाची आहे.

लग्नानंतरच्या कुमुदिनी दांडेकर म्हणजे खरे मास्तरांचे चौथे कन्यारत्न. कृष्णाबाई मोटे आणि मालतीबाई बेडेकर या त्यांच्या मोठ्या बहिणी. दांडेकरबाईंचा जन्म १४ मार्च १९२० रोजीचा. वडील शिक्षकी



पेशातील. आर्थिक परिस्थिती जेमतेमच असली तरी घरी संस्कारांची श्रीमंती होती. बाईंचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. मॅट्रिकच्या परीक्षेत पुण्यात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन बाईंनी त्यांची शैक्षणिक गुणवत्ता व प्रावीण्य सिद्ध केले. गणित या विषयाची पदवी मिळवून त्या पुढील शिक्षणासाठी कोलकात्याच्या (त्या वेळच्या उच्चारानुसार कलकत्ता) Indian Statistical Institute मध्ये दाखल झाल्या. M. Stat. ही पदवी घेऊन आणि आयुष्याचा जोडीदारही सोबतीला घेऊन बाई पुण्याला परतल्या. विख्यात अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत दोघेही रुजू झाले. आपापल्या संशोधन क्षेत्रात मग दोघांनीही स्वतःला पूर्णपणे झोकून दिले.

अर्थशास्त्रातील क्षेत्रीय सर्वेक्षणाचे तंत्र व त्याद्वारे हाती आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्याची शिस्त व पद्धती प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी जन्माला घातली, विकसित केली व इतरांना शिकविली असे म्हटले जाते. त्याच धर्तीवर, दांडेकरबाई या लोकसांख्यिकीय सर्वेक्षण पद्धतींच्या जनक आहेत, असे नक्कीच म्हणता येईल.

रॉकफेलर फौंडेशन या संस्थेने गोखले अर्थशास्त्र संस्थेस १९४९ साली पाच वर्षांसाठी संशोधन अनुदान दिले. गोखले अर्थशास्त्र संस्थेतील लोकसंख्या संशोधन विभाग त्या अनुदानाद्वारेच साकारला आणि स्वतंत्रपणे कार्यरत बनला. आपल्या देशातील अशा काही अगदी सुरुवातीच्या केंद्रांपैकी हे एक केंद्र होते. पुढे मग फोर्ड फौंडेशनचेही अनुदान मिळाले. रॉकफेलर फौंडेशनच्या अनुदानातून राज्यातील १२ जिल्ह्यांच्या ग्रामीण भागांत लोकसांख्यिकीय सर्वेक्षण करावयाचे होते. कुटुंब नियोजनाच्या स्वीकृतीबाबत या सर्वेक्षणाद्वारे प्रश्न विचारून माहिती संकलित करावयाची होती. त्या दृष्टीने कुटुंब नियोजनाच्या स्वीकृतीबाबत त्यात प्रश्न विचारलेले होते. या सर्वेक्षणासाठी दांडेकरबाई स्वतः फिरत असत. खेडोपाडी जाण्यासाठी त्या काळात चांगल्या सोयी नसत, हे इथे नोंदवून ठेवावयास हवे. दांडेकरबाई दिसल्या रे दिसल्या की, 'पोटं खाली करायला आली आहे', अशी प्रतिक्रिया उमटत असे. कुटुंब नियोजनाला लोकांचा पूर्ण विरोध नव्हता; परंतु, त्यांना हवी असलेली चार मुले झाल्यानंतर शस्त्रक्रिया करून

घेण्याबाबत त्यांची तयारी असे, हे वास्तव त्या सर्वेक्षणाद्वारे पुढ्यात साकारले. याच पाठिंब्याच्या आधारावर, मग, कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी शिबीर घेण्यासाठी दांडेकरबाईंनी मोर्चेबांधणी चालू केली. सातारा जिल्ह्यातील पुसेगाव येथे २२ पुरुषांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. देशातील ते पहिलेच शस्त्रक्रिया शिबीर असावे. एखाद्या संशोधन संस्थेने असे शिबीर घेण्याची घटनाही विरळाच. त्या पाठोपाठ, कोरेगावमधून ६० पुरुषांनी शस्त्रक्रिया करून घेण्याची तयारी दाखवली. मात्र, गोखले अर्थशास्त्र संस्था ही मुळात शैक्षणिक संस्था असल्याने तसे शिबीर घेण्याचे नाकारण्यात आले. परंतु, पुसेगावचा अनुभव दांडेकरबाईंना मात्र पुढील संशोधनासाठी पूरक-उपकारक ठरला.

कोलकाता (तेव्हाच्या उच्चारानुसार कलकत्ता) येथे असलेल्या Institute of Tropical Medicine मध्ये १९५३ साली भरलेल्या उपरनिर्दिष्ट परिषदेत त्या वेळी आणखी एक पृच्छा करण्यात आलेली होती. ती होती कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेच्या शारीरिक परिणामांबाबत तसेच लैंगिक सुखावर शस्त्रक्रियेमुळे होणा-या परिणामांबद्दल. साठ-एक वर्षांपूर्वी, म्हणजे १९५९ साली, इतक्या नाजूक विषयाबाबत प्रश्न विचारणे आणि वीर्यतपासणी करणे हे किती धाडसाचे असेल, याची कल्पनाच केलेली बरी. परंतु, दांडेकरबाईंनी ते धाडस केले. कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या १२०० पुरुषांची वीर्यतपासणी सांगलीच्या दोन डॉक्टरांच्या मदतीने केली गेली. प्रशिक्षित अन्वेषकांच्या साहाय्याने सर्वेक्षणही करण्यात आले. यातून दोन बाबी ध्यानात आल्या. एक म्हणजे, कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेचा शारीरिकदृष्ट्या काहीही अनिष्ट परिणाम झालेला नाही. आणि दुसरे म्हणजे, सर्वेक्षणात समावेश असलेल्या एकूणांतील ९२ टक्के पुरुषांनी शस्त्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त केले. या निष्कर्षांची नोंद मग सरकारदरबारी घेतली गेली आणि पुरुषांच्या शस्त्रक्रियांबाबतचे धोरण यथावकाश अस्तित्वात आले व निश्चित झाले. या बाबतीत श्रीगणेशा महाराष्ट्राने केला खरा. परंतु, नंतरच्या काळात अशी मोठमोठी शिबिरे भरवून केरळसारखी राज्ये पुढे निघून गेली आणि सुरुवातीस पदरी पडलेले श्रेय हरपले.



याच काळात दांडेकरबाईंचे अन्य संशोधनही चालूच होते. प्रा. वि. म. दांडेकर यांच्यासह त्यांनी १९५१ साली पुणे जिल्ह्याचे लोकसांख्यिकीय सर्वेक्षण केले. त्या सर्वेक्षणावर बेतलेल्या अहवालास त्या गमतीने त्यांचे तिसरे अपत्य असे म्हणत. प्रा. नी. वि. सोवनी यांच्यासह दांडेकरबाईंनी १९५३ साली नाशिक, सातारा व कुलाबा या तीन जिल्ह्यांत सर्वेक्षण केले व त्या पाहणीदरम्यान हाती आलेल्या माहितीच्या आधारे एक संशोधन अहवाल प्रसिद्ध केला. त्याच्या पुढील वर्षी, म्हणजे १९५४ साली एकंदर सहा ग्रामीण समुदायांमध्ये त्यांनी लोकसांख्यिकीय सर्वेक्षणे केली. त्या संदर्भातील अहवालही यथावकाश प्रसिद्ध झाला. विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे, Birth Interval बाबत दांडेकरबाईंनी सिद्ध केलेले संशोधनपर निबंध Eugenic Quarterly सारख्या सन्मान्य नियतकालिकातून १९५९ साली प्रकाशित झाले. याच सुमारास त्यांनी आणखी एक अतिशय महत्त्वपूर्ण संशोधन पूर्ण केले होते. कुटुंब नियोजन कार्यक्रमाची व्याप्ती आणि त्याचा जन्मदरावर होणारा परिणाम यांबद्दलचे ते अध्ययन होते. दांडेकरबाईंच्या या अभ्यासाची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावरही घेतली गेली.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

कुटुंब नियोजनाची स्वीकृती कशी वाढवता येईल याचा विचार दांडेकरबाई त्या काळात सतत करत असत. तेव्हा, वैद्यकीय उपचार करत असतानाच कुटुंब नियोजनाबाबतची जाणीव-जागृती करता येईल, असा विचार बाईंच्या मनात आला. मंचर येथे आकारास आलेल्या १५ खाटांच्या रु ग्णालयाच्या माध्यमातून दांडेकरबाईंच्या त्या विचाराला मूर्त स्वरू प लाभले. गोखले अर्थशास्त्र संस्थेने चोखाळलेली ही आणखी एक वेगळी वाट. मोठ्या मुष्किलीने दोन डॉक्टर मिळाले आणि १९५९ ते १९६५ या काळात संस्थेने ते रु ग्णालय चालविले. तेही अतिशय यशस्वीपणे. स्थानिक परिसरातील मुस्लिमधर्मीयांचा कुटुंब नियोजनास विरोध होता. त्यांची समजूत घालण्यासाठी अगदी पार इजिप्तच्या मुल्ला-मौलवींकडून फतवाही मागवून घेतला गेला. परंतु त्याचा काहीही परिणाम झाला नाही. आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी कोणत्याही पातळीवर प्रयत्न करण्याच्या दांडेकरबाईंच्या तयारीचा अंदाज त्यांच्या त्या सा-या धडपडीद्वारे सगळ्यांनाच त्या काळात पुरेपूर आला.

याच सुमारास (म्हणजे, १९६६ साली) दांडेकरबाईंनी आणखी एका प्रकल्पाला हात घातला. ज्या सहा गावांत १९५४ साली सर्वेक्षण झालेले होते त्याच सहा गावांत १२ वर्षांनंतर पुन्हा सर्वेक्षण करून दरम्यानच्या काळात तेथील जनजीवन व व्यवहारांत घडून आलेल्या बदलांची नोंद घेणे, हा त्या अभ्यासामागील हेतू. शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या प्रत्येक योजनेचे मूल्यमापन करायचेच, असे त्यानंतर जणू ठरू नच गेले. त्यांमुळे, कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या प्रत्येक टप्प्याचे अध्ययन केले गेले. दुस-या पंचवार्षिक योजनेदरम्यान आखला गेलेला Clinic Approach, १९६५ साली दाखला झालेले ‘लूप’, १९७२-७३ मध्ये आलेली बहुउद्देशीय कर्मचारी योजना (MPW Scheme), १९७६ सालातील आणीबाणीतील सक्तीच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेची योजना, १९७८ साली आलेली जनस्वास्थ्य रक्षक (Community Health Volunteer) योजना... अशांसारख्या विविध योजनांची मूल्यमापने दांडेकरबाईंच्या मार्गदर्शनाखालीच झाली. गोखले अर्थशास्त्र संस्थेचा आणि दांडेकरबाईंचाही शिरस्ता तसा असल्यामुळे मूल्यमापनाचे काम अतिशय परखडपणे केले जात असे. गोखले अर्थशास्त्र



संस्थेमधून निवृत्त होण्यापूर्वी (म्हणजे, १९८० साली) दांडेकरबाईंनी एक मोठ्या सर्वेक्षणाला हात घातला. या सर्वेक्षणात (NFMS, Maharashtra) महाराष्ट्रातील साडेसात हजार कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणासाठी प्रश्नावली तयार करणे, नमुना-निवड (sampling) व नमुना निवडीची पद्धती निश्चित करणे, अन्वेषकांचे प्रशिक्षण, प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षणाद्वारे माहिती गोळा करणे...अशा सर्व बाबी दांडेकरबाईंच्या मार्गदर्शनाखालीच झाल्या. परंतु, यथावकाश त्या निवृत्त झाल्यानंतर त्या अभ्यासाचे पुढील सर्व काम गोखले अर्थशास्त्र संस्थेतील प्रा. श्रीकांतन यांनी पार पाडले.

या व अशा अभ्यासप्रकल्पांच्या जोडीनेच दांडेकरबाईंनी अनेक विषयांवर संशोधनपर निबंध लिहिले. संशोधनाधारित असे १२ स्वतंत्र अहवाल व सुमारे ७५ ते ८० शोधनिबंध त्यांच्या नावावर आहेत. आजच्या पेपर ‘पाडण्याच्या’ जमान्यात शोधनिबंधांची ही संख्या कदाचित फारशी भरभक्कम आणि म्हणूनच आकर्षक वगैरे काही वाटणार नाही. परंतु, सुमारे ४० वर्षांपूर्वीच्या काळाबद्दल आपण बोलतो आहोत, हे या ठिकाणी विसरता कामा नये. संशोधनपर निबंधाचे लेखन, त्याचे प्रकाशन हा साराच व्यवहार तेव्हा आजच्या इतका सवंग नव्हता. कुटुंब नियोजन, जनन, आरोग्य, लोकसंख्याविषयक धोरण यांसारख्या विषयांव्यतिरिक्त क्षेत्रांतील दांडेकरबाईंचे कामही प्रसिद्ध झालेले आहे. Household Size and Composition in India, १९६१ या विषयावरील Census Monograph, स्त्रियांचा दर्जा, बालकामगार या विषयांवरील दांडेकरबाईंचे निबंध, रोजगार हमी योजनेच्या अभ्यासावर बेतलेला अहवाल यांसारखे त्यांचे संशोधनपर लेखन अन्य प्रांतांतील त्यांच्या अभ्यासाचे सूचन घडवतात.

आपल्या कार्यकालात त्यांनी अनेकदा परदेशवा-या केल्या. लोकसंख्या परिषदेची अभ्यासवृत्ती मिळवून त्या १९५७ साली अमेरिकेला गेल्या. त्या नंतर, ऑस्ट्रेलिया व इंग्लंड या देशांत आयोजित करण्यात आलेल्या जागतिक लोकसंख्या परिषदेमध्येही त्यांनी शोधनिबंध सादर केले. बेल्जियम, लेक्झिंग्टन, कुलालंपूर, मेक्सिको, फिनलंड या देशांत आयोजित करण्यात आलेल्या परिषदांमधूनही त्यांनी आपले शोधनिबंध

सादर केले. त्या काळात परदेशी जाणे हे आजच्या इतके सहज व सुलभ नव्हते. त्या तुलनेत दांडेकरबाईंचे अभ्यास व संशोधन परिषद-परिसंवादांसाठी परदेशी जाणे हे विशेष वाटते.

या क्षेत्रातील कामामुळे त्यांचे नाव सर्वदूर झाले होते. साहजिकच, अनेक संस्थांकडून संचालक अथवा तत्सम उच्चस्तरीय अधिकारपदांसाठीचा देकार त्यांच्याकडे येत असे. IAMR (नवी दिल्ली), IIPS (मुंबई) या संस्थांचे संचालकपद त्यांना देऊ करण्यात आले होते. Regional Demographic Advisor for South East Asia हे पदही त्यांना मिळण्यासारखे होते. परंतु, त्यांनी काही वेळा तब्येतीच्या किंवा अन्य घरगुती कारणांनी ती पदे व त्या संधी नाकारल्या.

अशा होत्या दांडेकरबाई. प्रा. वि. म. दांडेकर यांच्यासारख्या प्रभावी व्यक्तिमत्त्वापुढे त्या कधी तरी झाकोळल्यासारख्या वाटत. मात्र, लोकसंख्याविषयक सभासंमेलनांमधून आपल्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाने, सादरीकरणातील प्रभुत्त्वाने आणि ठाम परंतु सच्च्या मतप्रदर्शनाने त्या लोकांना इतके भारून टाकत की वाटावे - 'या सम याच !'

अशा आणि इतक्या कर्तृत्त्वसंपन्न दांडेकरबाईंचा दीर्घ सहवास मला लाभला. १ ऑगस्ट १९६८ या दिवशी मी गोखले अर्थशास्त्र संस्थेत रुजू झाले. मला त्या वेळी सगळ्यांच गोष्टी नवीन होत्या. नागपूरहून आलेली असल्याने गाव नवीन, संस्था नवीन, लोक नवीन आणि कामाचा विषयही नवीनच होता. संख्याशास्त्राची पदवी घेऊन मी आलेली होते परंतु इथे संस्थेत मात्र मला लोकसंख्या संशोधन विभागामध्ये काम करावयाचे होते. थोड्याशा उत्साहात परंतु बावरलेल्या अशा मनाच्या अवस्थेत मी दांडेकरबाईंना भेटले. त्यांच्या रुबाबदार देखणेपणाने मला दडपल्यासारखेच झाले. मग हळूहळू बोलणे-चालणे सुरू झाले. 'क्षणभर थांब', 'ती गोष्ट अलाहिदा'... अशासारख्या शब्दरचनेने सजलेल्या त्यांच्या पुस्तकी भाषेची गंमत वाटली. बर्कले यांचे लोकसंख्याशास्त्राचे पुस्तक त्यांनी मला वाचायला सांगितले. हळूहळू विषयही कळू लागला.

पुढे त्यांच्या हाताखाली मी १२ वर्षे काम केले. माझे डॉक्टरेटचे संशोधनही मी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. ती एक प्रकारची



तपश्चर्याच होती, असे मला आज वाटते. रोजच्या कामात संख्याशास्त्राचा संदर्भ व विषय फारसा निघत नसल्याने उदास वाटायचे. पण हळूहळू लोकसंख्याशास्त्रातही रस वाटू लागला. आमच्या संपूर्ण विभागाच्या बैठका दांडेकरबाई त्या काळात अधुनमधून घेत असत. आपले काम, त्यांतील अडचणी यांवर विभागातील प्रत्येकजण त्या बैठकीदरम्यान बोलत असे. चर्चेद्वारे त्या अडचणी व समस्यांवर तोडगाही निघत-सापडत असे. लोकसंख्याशास्त्रातील समस्या, अभ्यासप्रांत, दखलप्रांत विषय यांचा परिचय मला या बैठकांदरम्यानच्या चर्चांमधून होत राहिला. ते प्रश्न कळायला लागले. उपलब्ध आकडेवारीमधून निष्कर्ष कसे काढायचे तेही कळले. सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, संशोधन विषयाच्या मुळाशी जाऊन त्याची उकल कशी करावी, याची जाण मला दांडेकरबाईंकडूनच मिळाली. त्यांनी हाती घेतलेल्या विविध संशोधन प्रकल्पांमधील विश्लेषणातून त्यांची ती शैली स्पष्टपणे दिसून येते. गोखले अर्थशास्त्र संस्थेतील त्या काळच्या सर्वच संशोधनाचे मर्मच ते होते.

दांडेकरबाईंचे बरेचसे काम सर्वेक्षणांवर आधारित असेच होते. त्यांमुळे, सर्वेक्षणांद्वारे हाती येणारी माहिती ही उच्च दर्जाचीच असली पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असे. भरून आणलेली एक न् एक प्रश्नावली बारकाईने तपासली जात असे. विश्लेषण करत असताना एखादी अनपेक्षित अशी बाब ध्यानात आली अथवा आढळली तर अगदी त्या गोष्टीच्या मुळापर्यंत जाऊन ती तपासली जात असे. या आधीच सांगितल्यानुसार, विश्लेषण अतिशय परखडपणे केले जात असे. प्रगत सांख्यिकीय प्रणालींच्या मागे फार न लागता अगदी साध्या साध्या तक्त्यांमधूनही वास्तवाचे चांगले आकलन कसे होऊ शकते, याचा उत्तम दाखला, वस्तुपाठ मिळत असे. सांख्यिकी प्रणाली नीट समजावून न घेताच त्यांचा अतिरेकी वापर होताना आज जेव्हा मी बघते त्या वेळी मला हमखास दांडेकरबाईंच्या साध्या व समर्पक विश्लेषणशैलीची आठवण होते.

हे सगळे शिक्षण-प्रशिक्षण विलक्षण उद्बोधक निश्चितच असले तरी ते सुलभ मात्र नव्हते. बाईंची शिस्त अतिशय कडक होती. वेळेच्या आणि इंग्रजीच्याबाबतीत त्या विलक्षण काटेकोर होत्या. काही काही वेळा

तर त्या काटेकोरपणाचा जाच वाटायचा. त्यांचा विश्वास संपादन करणे ही तर फारच कठीण बाब होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेटचा अभ्यास करत असताना त्यांच्याकडून मी खूप काही शिकले. पण फारच कठिण दिवस होते ते. ''डॉक्टरेटचा विद्यार्थी आणि त्याचा मार्गदर्शक यांच्यादरम्यानचे नाते हे घरमालक व बि-हाडकरूयांच्यातील नात्यासारखेच काटेरी असते'', असे त्याच म्हणायच्या. ''वास्तविक पाहता तुम्हांला दोन डॉक्टरेट द्यायला हव्यात. एक तुमच्या कामासाठी आणि दुसरी तुम्ही दांडेकरबाईंकडे काम केलेत म्हणून'', असे विख्यात लोकसंख्याशास्त्रज्ञ डॉ. श्रीनिवासन मला म्हणालेही होते. अर्थात, डॉक्टरेटचे काम करत असताना माझ्या कामासंदर्भात निर्माण झालेल्या काही अडचणींचे निवारण करण्याच्याबाबतीत बाईंनीच मला खूप मदतही केली होती. असो.

आता हे सगळे मी मागे सोडले आहे. आज माझ्या मनात त्यांच्याबद्दल निव्वळ आदर आणि आदरच वसतो आहे. तब्बल १२ वर्षे केलेल्या तपश्चर्येची फळे मला नक्कीच मिळालेली आहेत. ●●

**लेखक परिचय**

(१) भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक मंडळाच्या एक मानद सदस्य असलेल्या डॉ. रूपा रेगे - नित्सुरे या सध्या 'एल ॲन्ड टी फायनान्शिअल सर्व्हिसेस'च्या समूह अर्थतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्या आधी बँक ऑफ बडोदाच्या मुख्य अर्थतज्ज्ञ म्हणून त्या काम पाहत होत्या. बँकिंग आणि वित्तीय सेवाक्षेत्रातील प्रत्यक्ष काम व संशोधन अशा दोन्ही अंगांनी डॉ. रेगे गेली सुमारे तीन तपे सक्रिय आहेत.

(२) 'लोकसंख्याशास्त्र' या विषयाच्या मर्मज्ञ अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून विख्यात असलेल्या डॉ. संजीवनी मुळ्ये या भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीशी संलग्न संशोधक या नात्याने जोडलेल्या आहेत. पुण्याच्या सुविख्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये चार दशकांहून अधिक काळ संशोधक व अध्यापक म्हणून त्या कार्यरत होत्या.

●●



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **२०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **८०० /- रुपये** |

# *ग्रंथालयातील पुस्तके*

**CULTURAL POLITICS in Modern India : Postcolonial Prospects, Colourful Cosmopolitanism, Global Proximities, by Makarand R. Paranjape, First South Asia edition 2016, A Routledge India Original, First published by Routledge, 2016, New York, pp. Xii + 301, Price - Rs.995/-**

हिंदुस्थानातील जनजीवन, चालीरीती, संस्कृती, समाजव्यवहार, जीवनराहाटी... अशांसारख्या असंख्य बाबींवर ब्रिटिश राजवटीचा नेमका काय परिणाम झाला, या बाबत अनेक अभ्यासक, संशोधक व विद्वानांनी आजवर उदंड विचारमंथन केलेले आहे. ब्रिटिश सत्तेने एतद्देशीयांना नेमके काय दिले आणि या ब्रिटिशांबरोबरील देवाणघेवाण आणि त्यांच्या विरोधात हिंदुस्थानवासियांनी छेडलेले स्वातंत्र्यसमर यांतून कशाप्रकारचे भारतीय मन क्रमाने घडत गेले, हाही असाच एक बहुमिती आयाम असलेला संशोधनविषय. मुळात, भारतीय मानसातून उत्क्रांत झालेल्या विश्वबंधुत्वाच्या भावनेचा उगम नेमका शोधायचा तरी कोठे, याचा शोध देशोदेशीचे चिकित्सक आपापल्या परीने घेत आलेले आहेत. विश्वबंधुत्वाच्या त्या भावनेचा आधुनिक परिपोष जरी ब्रिटिशांबरोबरील स्वातंत्र्यचळवळीद्वारे मुख्यतः झालेला असला तरी, विश्वबंधुत्वाच्या भावनेचे बीजांकुरण भारतीय अध्यात्माच्या भूमीमध्ये घडलेले आहे, हे प्रस्तुत ग्रंथातील गाभाप्रमेय होय. आध्यात्मिक विचार आणि वारसा यांचे दृढ अस्तर, भारतीय भूमीमध्ये प्राचीन काळी अंकुरलेल्या विश्वबंधुत्वाच्या भावनेला जोडलेले असल्यामुळेच तो विचार सर्वसमावेशक, परस्परसंवादी आहे आणि त्यांमुळेच प्रस्तुत ग्रंथाचे लेखक त्याला 'रंगमय विश्वबंधुत्व' असे संबोधतात. इतिहास, संस्कृती, राजशास्त्र अशा विविध प्रांतांतील जिज्ञासूंना वैचारिक खाद्य पुरविणारा असाच हा ग्रंथ आहे. ●●



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ● 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ● भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ● अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ● इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ● संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

● संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

● अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

● विकास चित्रे ● किशोर चौकर ● सुरिंदर जोधका ● रमानाथ झा
● अभय टिळक ● रवींद्र ढोलकिया ● ललित देशपांडे ● दिलीप नाचणे
● सुहास पळशीकर ● मनोहर भिडे ● नीळकंठ रथ ● रूपा रेगे-नित्सुरे
● एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**